# अपहरणासह खुन करून मृताची विल्हेवाट लावून गुन्ह्यात फरार असलेले व नागपूर येथून हद्दपार असलेले अट्टल आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात

मा. पोलीस अधीक्षक, वर्धा याचे आदेशान्वये घरफोडी व इतर गुन्ह्याचे संबंधाने वर्धा शहर परिसरात पेट्रोलिंग सुरु असताना दोन संशयीत ईसम हे स्टेशन फैल परिसरात संशईत रित्या फिरतांना मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेऊन कसून चौकशी करून पोलीस खाक्या दाखविला असता, सदर संशयीत इसम १) कमल रामदास काळे, वय २६ वर्ष, रा. इंदिरा नगर, जरीपटका, नागपूर, २) शुभम उर्फ चिनी राजेश भगत, वय २५ वर्ष, रा. ओम नगर, नारा रोड, जरीपटका, नागपूर यांनी सांगितले कि, त्यांना पोलीस स्टेशन जरीपटका नागपूर येथून दोन वर्षा करिता हद्दपार केले असुन त्यांनी त्यांचे साथीदारासह दि ०२ ऑगस्ट २०२१ रोजी पोलीस स्टेशन गोबरवाही, जि. भंडारा हद्दीत मृतक नामें नंदकिशोर माने यास अपहरण करून जीवानीशी ठार मारून मृतदेहाची विल्हेवाट लावण्याकरिता मृतदेह पेटवून नाल्यात फेकून फरार झाले. तसेच त्यांनी सावनेर रोड, नागपूर येथून मोटर सायकल चोरून फरार असल्याचे सांगितले व सदर दोन्ही गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपितांनी सांगितल्या प्रमाणे शहाणीशा करण्यात आली असता पो.स्टे. गोबरवाही.जि.भंडारा येथे अप.क्र. १००/२०२१ कलम ३०२, ३२३, ३६३, २०१, ३४ भा.दं.वि अन्वये नोंद असल्याने त्यांना पुढील कारवाई करिता पो.स्टे. गोबरवाही.जि.भंडारा यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पूढील तपास पोस्टे गोबरवाही जि भंडारा करीत आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत होळकर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. यशवंत सोळंके यांचे मार्गदर्शनात मा. पोलीस निरीक्षक श्री. निलेश ब्राम्हणे यांचे निर्देशाप्रमाणे स.पो.नि. महेन्द्र इंगळे,पोलीस अंमलदार संतोष दरगुडे, स्वप्नील भारव्दाज, चंद्रकांत बुरंगे, राजेश तिवस्कर, संघसेन कांबळे, राकेश आष्टणकर, विकास अवचट, रितेश शर्मा, श्रीकांत खडसे, प्रदिप वाघ यांनी केली.